# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती ४४४६०३

Email :- roamravati.dte@gmail.com Web :- www.jdroamt.org Phone :- 0721- 2573027, 2572577 Fax :- 0721- 2577913


## गट- क व गट-ड संवर्गातील रिक्त पदे भरणे करीता जाहिरात

सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांचे अधिनस्त जिल्हयातील संस्था/कार्यालयामधील खाली नमुद केलेल्या प्रवर्गातील गट-क व गट-ड सवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. अर्ज **www.jdroamt.org** या संकेतस्थळावर ऑन लाईन भरुन पुर्णपणे भरलेल्या अर्जाची छापील प्रत, परिक्षा शुल्क भरले म्हणून दर्शविनारे "चलान प्रत" ( परिशिष्ठ २ वाचावे ) तसेच जाहिरातील नमुद केलेल्या आवश्यक कागदपत्रासह **सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगे नगर ,अमरावती, ४४४६०३ येथे दिनांक ४ फेब्रुवारी २०१५** रोजी सायंकाळ ५-०० वाजे पर्यंत स्विकारण्यात येईल. त्यानंतर आलेल्या अर्जाचा विचार केल्या जाणार नाही.

| अ.क्र. | पदाचे नाव/वेतनश्रेणी (सहाव्या वेतन आयोगानुसार) | रिक्त पदांची संख्या | सामाजिक व समांतर आरक्षण |
|---|---|---|---|
| १ | **वरिष्ठ लिपीक**<br>**पे बँड ५२००-२०२००,ग्रेड पे रु. २४००/)** | ०७ | अ.जाती-१<br>अ.जमाती-१<br>ई.मा.व-२<br>खुला-३ (१-मा.सैनिक) |
| २ | **लघुटंकलेखक**<br>**पे बँड ५२००-२०२००,ग्रेड पे रु. २४००/)** | ०१ | अ.जमाती-१ |
| ३ | **प्रयोग शाळा सहाय्यक (तांत्रिक)**<br>**पे बँड ५२००-२०२००,ग्रेड पे रु. २४००/-** | ०८ | अ.जाती-१<br>अ.जमाती-२<br>ई.मा.व-१<br>खुला-४ (१-महिला) |
| ४ | **प्रयोग शाळा सहाय्यक**<br>**पे बँड ५२००-२०२००,ग्रेड पे रु. २०००/-** | ०२ | अ.जमाती-१<br>ई.मा.व-१ |
| ५ | **यंत्र परिचर**<br>**पे बँड ४४४०-७४४०,ग्रेड पे रु. १३००/-** | ०१ | खुला-१ |
| ६ | **शिपाई /ग्रंथालय शिपाई**<br>**पे बँड ४४४०-७४४०,ग्रेड पे रु. १३००/-** | ०२ | अ.जाती-१<br>खुला -१ |
| ७ | **हमाल/प्र.शा.परिचर**<br>**पे बँड ४४४०-७४४०,ग्रेड पे रु. १३००/-** | ०६ | अ.जमाती-१<br>भ.ज.(क) -२<br>इ.मा.व.-३ (१ महिला ) |

**टिपः जाहिराती संदर्भात विस्तृत माहिती (जसे शैक्षणिक अर्हता,अनुभव,सर्वसाधारण अटि व शर्ती,परिक्षा फी व अर्ज भरण्याची पध्दत ) या कार्यालयाचे संकेतस्थळ www.jdroamt.org वर देण्यात आलेली आहे.**

जावक क्र.विकाअ/आस्था/पदभरती/जानेवारी २०१५/ ९०८
दिनांक :- १४/१/२०१५
स्थळ:-अमरावती

प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण
वि.का.अमरावती

D:\padbharti 2014-15.doc

## -: शैक्षणीक अर्हता, अनुभव व अन्य अटि :-

| अ.क्र. | पदाचे नांव/वेताश्रेणी (सहाव्या वेतन आयोगानुसार) | शैक्षणीक व व्यावसायीक अर्हता |
|---|---|---|
| १ | वरिष्ठ लिपीक<br>पे बँड ५२००-२०२००, ग्रेड पे रु. २४००/- | * मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी परीक्षा उत्तीर्ण (कला,विज्ञान,वाणिज्य, कायदा)<br>आणि<br>शासकीय कार्यालय किंवा शासकीय उपक्रम किंवा व्यावसायीक आस्थापनातील प्रशासकीय आणि /किंवा लेखा विषयक कामकाजाचा किमान एक वर्षाचा अनुभव आवश्यक |
| २ | लघुटंकलेखक<br>पे बँड ५२००-२०२००, ग्रेड पे रु. २४००/- | * माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (१० वर्ग उत्तीर्ण)<br>* लघुलेखन किमान ८० शब्द प्रतिमीनीट उत्तीर्ण<br>* इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि. उत्तीर्ण<br>* मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि. उत्तीर्ण |
| ३ | प्रयोग शाळा सहाय्यक (तांत्रिक)<br>पे बँड ५२००-२०२००, ग्रेड पे रु. २४००/- | * महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाचे /समकक्ष शासन मान्य स्वायत्त संस्थेतील अभियांत्रिकी शाखेतील तिन वर्षीय पदविका (Engineering /Technology) उत्तीर्ण. सबंधीत क्षेत्रातील एक वर्षाचा प्रयोग शाळा सहाय्यक /मॅन्युफॅक्चरिंग/मेंन्टनेंस/डिझायनींग/ CNC मशीन हाताळण्याचा अनुभव |
| ४ | प्रयोग शाळा सहाय्यक<br>पे बँड ५२००-२०२००, ग्रेड पे रु. २०००/- | * माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (१० वर्ग उत्तीर्ण)<br>* प्रयोग शाळेतील कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य |
| ५ | यंत्र परिचर<br>पे बँड ५२००-२०२००, ग्रेड पे रु. १३००/- | * किमान ४ था वर्ग उत्तीर्ण<br>* मशीन हाताळण्याचा अनुभव |
| ६ | शिपाई /ग्रंथालय शिपाई<br>पे बँड ४४४०-७४४०, ग्रेड पे रु. १३००/- | * किमान ४ था वर्ग उत्तीर्ण<br>* शिपाई पदाचे काम करण्यास सक्षम |
| ७ | हमाल/प्र.शा.परिचर<br>पे बँड ४४४०-७४४०, ग्रेड पे रु. १३००/- | * किमान ४ था वर्ग उत्तीर्ण<br>* हमाल पदाचे काम करण्यास सक्षम |

प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण
अमरावती

# सर्वसाधरण अटि व शर्ती

१) प्रत्येक पदांकरीता अर्ज करावयाचा असल्यास पदनिहाय स्वतंत्र अर्ज करावा.

२) वयोमर्यादा जाहिरातीतील नमुद सर्व पदांकरीता उमेदवारांचे वय जाहिरातीच्या दिनांकास १८ वर्षापेक्षा कमी नसावे. तसेच सर्व साधारण प्रवर्गातील उमेदवारासाठी ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे. मागासवर्गीयांकरिता ५ वर्ष शिथलक्षम म्हणजेच ३८ वर्षा पेक्षा जास्त नसावे. तसेच माजी सैनिक, अपंग, पदवीधर अंशकालीन कर्मचारी, प्रकल्पग्रस्त /भूकंपग्रस्त उमेदवारांकरीता कमाल वयोमर्यादा शासनाच्या प्रचलित नियमानुसार शिथीलक्षम राहील.

३) <u>अर्ज सादर करण्याची पध्दत,पाठविण्याचा पत्ता</u>: ईच्छुक व अर्हता प्राप्त उमेदवारांनी या कार्यालयाच्या संकेतस्थळावर **<u>www.jdroamt.org</u>** ऑन लाईन पध्दतीने भरुन त्याची प्रीन्ट आऊट आवश्यक प्रमाणपत्राच्या साक्षांकीत प्रती व शुल्क बॅकेत भरले हे दर्शविणा-या चलान प्रतीसह ( परिशिष्ठ २ पाहावे ) सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर,अमरावती ४४४६०३ या पत्यावर विहीत कालमर्यादेत पाठवावे.

४) रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन अधिकारी, सेवायोजन कार्यालय, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी कार्यालय व प्रकल्प अधिकारी, एकात्मीक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाकडे नोंदणीकृत असलेल्या उमेदवारांनी देखील वरिल प्रमाणे विहीत नमुन्यात अर्ज सादर करणे बंधनकारक राहील.

५) सर्व पदांच्या परीक्षेकरीता खुला प्रवर्ग रु.४००/- व मागासवर्गीयांकरीता रु.३००/- परीक्षा शुल्क आहे.सदर परीक्षा शुल्क सोबत जोडलेल्या सूचनाचे पालन करुन भरावे. (परिशिष्ठ २. पाहावे ) विहीत शुल्क न भरल्यास अर्ज रदद् करण्यात येईल.माजी सैनिकांकरीता परीक्षा शुल्क लागु नाही.तसेच परीक्षा शुल्क हे नापरतावा राहील.

६) **(अ)** वरिष्ठ लिपीक व प्रयोगशाळा सहायक या पदासाठी २०० गुणाची लेखी परीक्षा घेण्यात येईल. वरिष्ठ लिपीक,प्रयोगशाळा सहाय्यक या पदाकरीता मराठी,इंग्रजी,सामान्य ज्ञान व बौध्दिक चाचणी या विषया वरील प्रश्नांकरीता समान गुण ठेवून २०० गुंणाची वस्तुनिष्ठ ,बहुपर्यायी लेखी परीक्षा घेण्यात येईल त्यानुसार लेखी परीक्षेतील गुणवत्तेनुसार उमेदवाराची निवड करण्यात येईल.

**(ब)** लघुटंकलेखक व प्रयोगशाळा सहाय्यक (तांत्रीक)या पदाकरीता मराठी,इंग्रजी,सामान्य ज्ञान व बौध्दिक चाचणी विषया वरील प्रश्नांकरीता समान गुण ठेवुन १२० गुणांची वस्तुनिष्ठ बहुपर्यायी लेखी परीक्षा घेण्यात येईल. सदर लेखी परीक्षेत उत्तिर्ण झालेल्या उमेदवारांची ८० गुणांची व्यवसायीक चाचणी घेण्यात येईल. त्यानुसार लेखी परीक्षा तसेच व्यावसायीक चाचणी याचे एकत्रीत गुणानुसार उमेदवाराची निवड करण्यात येईल.

**(क)** शिपाई /ग्रंथालय शिपाई, हमाल/प्रयोगशाळा परिचर व यंत्र परिचर या पदाकरीता मराठी,सामान्य ज्ञान व भौगोलीक ज्ञान या विषयावरील प्रश्नांकरीता एकुण ८० गुणांची वस्तुनिष्ठ बहुपर्यायी लेखी परीक्षा घेण्यात येईल.या परिक्षेतील उमेदवारांच्या गुणांचे मापदंडानुसार/आरक्षणानुसार मेरीट लिस्ट तयार करुन त्यानुसार (एका पदास किती उमेदवांराची मुलाखत घेणे आवश्यक आहे याचे निर्देशानूसार)मुलाखतीचे वेळापत्रक दर्शविन्यात येईल सदर मुलाखत एकुण २० गुणांची राहील. तसेच लेखी परीक्षा व मुलाखत याचे एकत्रीत गुणानुसार उमेदवाराची निवड करण्यात येईल.

७) उमेदवारांना मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

८) प्रीन्टआऊट अर्जा सोबत (अर्जाचे माहितीचे पृष्ठयर्थ) शैक्षणीक अर्हता, वय, जातीचा दाखला व जात वैधता प्रमाणपत्र (उपलब्ध असल्यास), अनुभव प्रमाणपत्र, महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्या बाबतचे प्रमाणपत्र, नियमानुसार आवश्यक नॉन क्रिमिलीअर प्रमाणपत्र व इतर आवश्यक प्रमाणपत्राच्या साक्षांकीत प्रती जोडणे आवश्यक आहे. अर्ज स्विकरण्याच्या अंतिम तारखेपर्यंत उमेदवारांनी सादर केलेलीच कागदपत्रे विचारात घेतल्या जाईल. त्यानंतर सादर केलेली कागदपत्रे विचारात घेतल्या जाणार नाहीत.

९) विहीत नियमानुसार अ.क्र.५,६,व ७ ची पदे वगळुन जाहिरातीतील सर्व पदाकरीता उमेदवाराने संगणक हाताळणी/वापराबाबतचे विहित प्रमाणपत्र 'DOEACC' सोसायटीच्या अधिकृत 'C.C.C' किंवा ' O ' स्तर, किंवा 'B ' स्तर, किंवा 'C' स्तर या पैकी कोणतीही एक परीक्षा उतीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्ष मंडळ मुंबई यांचे कडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र नियुक्तीच्या दिनांकापासुन दोन वर्षाच्या आत सादर करणे आवश्यक राहील. विहीत मुदतीत संगणक हाताळणे /वापराबाबत प्रमाणपत्र सादर न केल्यास तात्काळ सेवा समाप्त करण्यात येईल.

१०) उमेदवारांना लेखी परीक्षा/व्यवसायीक चाचणी/मुलाखत या साठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

११) प्रीन्ट आऊट अर्जाच्या प्रथम पानावरील उजव्या बाजुला नुकताच काढलेला पासपोर्ट आकाराचा फोटो साक्षांकीत करुन लावण्यात यावा.

१२) लेखी परीक्षा /व्यावसायीक चाचणी /मुलाखतीचे वेळापत्रक या कार्यालयाचे संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल.

१३) शासन निर्णय क्र.अनियो-२००५/१२६/सेवा-४,दिनांक ३१-१०-२००५ अन्वये दिनांक १ नोव्हेंबर २००५ पासुन नविन परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजना लागु करण्यात आल्यामुळे नियुक्त करण्यात येणा-या उमेदवारास नविन परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजना लागु ठरेल. निवृत्ती वेतन (म्हणजे म.ना.सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ व म.ना.सेवा (निवृत्ती वेतनाचे अंशराशिकरण) नियम १९८४) आणि सध्या अस्तीत्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू होणार नाही.

१४) समांतर आरक्षणातील योग्य उमेदवार उपलब्ध न झाल्यास सबंधीत प्रवर्गातील सर्वसाधारण उमेदवारांचा त्यासाठी विचार केल्या जाईल.

१५) शासकीय/निमशासकीय सेवेत असलेल्या कर्मचा-यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या कार्यालय प्रमुखांचे मार्फत कार्यालयाचे "ना-हरकत प्रमाणपत्र" घेवुन या कार्यालयास सादर करावे.

१६) अनुभवाच्या बाबतीत तासिका, नियतकालिक, अंशकालीक, विद्यावेतन, ॲप्रेंटिशीप ,अभ्यागत,अंशदानात्मक, विद्यावेतन तत्वावर केलेल्या अंशकालीन सेवेचा कालावधी तसेच प्रभारी म्हणुन नेमणुकीचा कालावधी, अतिरिक्त कार्यभाराचा कालावधी अनुभवासाठी ग्राहय धरता येणार नाही. तसेच अंशकालिक उमेदवारांच्या बाबतीत अनुभव एक वर्ष म्हणजे तीन महिने या प्रमाणे गृहीत धरण्यात येईल.

१७) विजा-अ, भ.ज.ब, भ.ज.क व ई.मा.व. या प्रवर्गातील उमेदवारांसाठी शासन परिपत्रक सामान्य न्याय, सांस्कृतीक व न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.सी.बी.सी.-१०/२००६/प्र.क्र१५/मावक-५, दिनांक ३०-६-२००६ सोबतच्या सुधारीत नमुन्यात त्यांची जात उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉन क्रिमिलिअर) सक्षम अधिका-याचे दिनांक ३१-३-२०१५ पर्यंत वैध असलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

१८) आरक्षित पदाकरीता उमेदवारांची निवड झाल्यास जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी समितीचे वैधता प्रमाणपत्र शासनाच्या प्रचलित नियमानुसार वेळेच्या आत सादर करणे बंधनकारक आहे. जात वैधता प्रमाणपत्र वेळेच्या आत सादर न केल्यास त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

१९) शासन अधिसुचना एस.आर.व्ही-२०००/प्र.क्र./(१७/२०००)/बारा,दिनांक २८-३-२००५ नुसार अ नियम ४ प्रमाणे लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र अर्जा सोबत सादर करणे आवश्यक राहील.

२०) निवड प्रक्रीया सुरु झाल्या नंतर किंवा नियुक्ती नंतर कोणत्याही क्षणी उमेदवारांने अर्जात व अर्जा सोबत दिलेली माहिती कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवुन ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी नियुक्ती निवड प्रक्रीयेच्या कोणत्याही टप्प्यावर रदद् करण्यात येईल.

२१) पदभरतीची प्रक्रीया अत्यंत तर्कशुध्द व पारदर्शक पध्दतीने गुणवत्तेच्या आधारे पार पाडली जाणार असल्याने कोणीही कोणत्याही प्रलोभनांना बळी पडु नये. एखादया उमेदवाराने त्यांच्या निवडीसाठी निवडसमितीवर प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष राजकीय अथवा अन्य प्रकारे दबाव आनल्यास अथवा गैर प्रकारांचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रक्रीयेतुन अपात्र ठरविण्यात येईल.

२२) निवड झालेल्या उमेदवारांची नियुक्ती विभागात कोठेही करण्यात येईल व तो बदलीस पात्र राहील.

२३) अतिरिक्त संवर्ग, आंतरविभागीय समायोजन,बिंदुनामावली इत्यादी व अन्य कारणामुळे पदसंख्या (पदसंख्येत कमी/जास्त होणे) व आरक्षणामध्ये बदल होवु शकतो. या बाबत कोणतही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

२४) महिला आरक्षण हे शासन निर्णय महिला व बालकल्याण विभाग ८२/२००१ म.से.आ.-२०००/प्र.क्र.४१५/का-२,दिनांक २५-५-२००१ मधिल तरतूदीनुसार राहील.खुल्या प्रवर्गातील महिलांना उन्नत व प्रगत व्यक्ती व गट यामध्ये मोडत नसल्या बाबतचे सक्षम अधिकरी यांचे दिनांक ३१-३-२०१५ या दिनांका पर्यंत वैध असलेल्या नॉन क्रिमिलीअर प्रमाणपत्राची साक्षांकीत प्रत कागदपत्रे पडताळणीचे वेळेस सादर करणे आवश्यक आहे.

२५) खुल्या प्रवर्गातील महिला आरक्षित पदासाठी अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती या प्रवर्गातील महिला उमेदवारांनी सक्षम प्राधिका-यांने निर्गमित केलेले जात व जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवययक राहील. जर त्या त्यांच्या जात व जात वैधता प्रमाणपत्र सादर करु शकत नसतील तर अशा महिला उमेदवारांना खुल्या प्रवर्गातून महिलांप्रमाणेच उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्या बाबतचे नॉन क्रिमिलीअर प्रमाणपत्र अर्जा सोबत सादर करणे आवश्यक राहील.

२६) एकापेक्षा अधिक पदाकरीता अर्ज केलेल्या उमेदवारांच्या बाबतीत खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

**(अ)** वरिष्ठ लिपीक व प्रयोगशाळा सहाय्यक पदांकरीता एकच परिक्षा घेण्यात येईल. मात्र दोन्ही पदाकरीता इच्छुक उमेदवारांनी वेगवेगळे अर्ज करणे आवश्यक राहील. दोन्ही पदाकरीता अर्ज केलेल्या उमेदवाराने जरी त्यांनी एकाच पदाची लेखी परिक्षा दिली, तरी त्यांचे 'अ' मध्ये नमुद पदाकरीता गुण ग्राहय धरण्यात येतील

(ब) लघुटंकलेखक व प्रयोग शाळा सहाय्यक (तांत्रिक) पदांकरीता एकच परिक्षा घेण्यात येईल. मात्र दोन्ही पदाकरीता इच्छुक उमेदवारांनी वेगवेगळे अर्ज करणे आवश्यक राहील. दोन्हीही पदाकरीता अर्ज केलेल्या उमेदवारांने जरी त्यांनी एकाच पदाची लेखी परिक्षा दिली, तरी त्यांचे 'ब' मध्ये नमुद पदाकरीता गुण ग्राहय धरण्यात येतील.

(क) शिपाई/ग्रंथालय शिपाई, हमाल/प्रयोग शाळा परिचर व यंत्रपरिचर पदांकरीता एकच परिक्षा घेण्यात येईल. मात्र तीन्हीही पदाकरीता इच्छुक उमेदवारांनी वेगवेगळे अर्ज करणे आवश्यक राहील. तीन्ही पदाकरीता अर्ज केलेल्या उमेदवारांने जरी त्यांनी एकाच पदाची लेखी परिक्षा दिली, तरी त्यांचे 'क' मध्ये नमुद पदाकरीता गुण ग्राहय धरण्यात येतील.

२७) ज्या उमेदवारांचे नांवे जाहिराती मधील नमुद केलेल्या पदांसाठी जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालय तसेंच आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय यांचे कडुन प्राप्त होतील त्यांनी स्वतंत्रपणे अर्ज करणे आवश्यक राहील. सदर विहीत नमुन्यातील अर्ज सबंधीत उमेदवारांना परिक्षे पुर्वी या कार्यालयाचे वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात येईल. पुर्ण भरलेला अर्ज परीक्षेला येतांना आवश्यक शुल्कासह सोबत घेवुन येणे आवश्यक आहे.

२८) पदभरती बाबतचे संपुर्ण वेळापत्रक /अधिसुचना या कार्यालयाच्या संकेस्थळावर वेळोवेळी घोषित करण्यात येईल.पदभरती संबंधात कुठलाही पत्रव्यवहार करण्यात येणार नाही.

२९) उमेदवारांनी पदभरती प्रक्रीये विषयक माहितीसाठी या कार्यालयाचे संकेस्थळ नियमित पहावे.

३०) उमेदवार सदर पदाकरीता पात्र नसेल (उदा:शैक्षणीक अर्हता, अनुभव, जातीचा प्रवर्ग इत्यादी) तर त्याची उमेदवारी केव्हाही रदद् करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

३१) उमेदवारास लेखी परीक्षा बाबतची माहिती, आसन क्रमांक, बैठक व्यवस्था, परीक्षा केंद्र, वेळापत्रक इत्यादी माहिती या कार्यालयाच्या संकेस्थळावर बघता येईल.

३२) परीक्षेस येतांना उमेदवारांने स्वत:चे लॉगीनमधुन हॉल तिकीट प्रीन्ट करुन साक्षांकीत फोटोसह सोबत आणावे. परीक्षेकरीता येतांना उमेदवाराने पॅन कार्ड /आधार कार्ड/वाहन चालविण्याचा परवाना/पासपोर्ट/ मतदान कार्ड/शाळा किंवा महाविद्यालयाचे ओळखपत्र इत्यादी सोबत आणणे आवश्यक आहे.
<u>उमेदवारास स्वतंत्र प्रवेशपत्र (Hall Ticket) पोष्टाने पाठविण्यात येणार नाही. याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.</u>

३३) उमेदवाराचे पदभरतीचे विहीत नमुन्यातील अर्ज आवश्यक कागदपत्रासह शासकीय सुटीचे दिवस वगळुन कार्यालयीन वेळेत (सकाळी १०-३० ते सायंकाळी ५-०० पर्यंत ) स्विकारण्यात येईल.याबाबत सोबत जोडलेल्या **महत्वाच्या तारखा** बघाव्या.

३४) लेखी परीक्षेला उमेदवाराला पुर्ण वेळ परीक्षा कक्षात थांबणे आवश्यक आहे. परीक्षा संपल्यानंतर उमेदवार प्रश्न पत्रीका घेवुन जातील.

३५) परीक्षेसाठी येतांना प्रवेशपत्र (हॉल तिकीट) असणे आवश्यक आहे. प्रवेशपत्राची झेरॉक्स प्रत स्वत:कडे ठेवावी. मुळ प्रवेशपत्र पर्यवेक्षकाकडे देण्यात यावे ते परत मिळणार नाही.

३६) प्रश्नपत्रीके मध्ये काही तृटी असल्यास Answer Key संकेतस्थळावर प्रदर्शित केल्यानंतर २४ तासात काही आक्षेप असल्यास कळविण्यात यावे. तदनंतर प्राप्त झालेला आक्षेप विचारात घेण्यात येणार नाही.

३७) सदरच्या जाहिरातीमध्ये दर्शविण्यात आलेल्या रिक्त पदांच्या संख्येत कमी/जास्त बदल होण्याची शक्यता आहे. काही अपरिहार्य कारणाने परीक्षा स्थगित झाल्यास त्याबाबत अर्जदाराला कोणताही दावा सांगता येणार नाही. परीक्षेचा प्रकार, पदांची संख्या, समांतर आरक्षण, सामाजिक आरक्षण यात बदल करणे, परीक्षा स्थगित करणे व रदद् करणे, अंशत:बदल करणे, तसेच सेवा भरती प्रक्रियेत बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती हे स्वत:कडे राखुन ठेवत आहेत. भरती प्रक्रीये संदर्भात उदभवणारे वाद, तक्रारी इत्यादी बाबत सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांचा निर्णय अंतिम राहील.

३८) <u>ऑन लाईन पध्दतीने अर्ज करण्याची पध्दत स्वतंत्र पानावर देण्यात येत आहे. ( परिशिष्ठ १ बघावे ) काळजी पुर्वक वाचुन कार्यवाही करावी.</u>

३९) परीक्षा शुल्क/प्रक्रीया शुल्क भरण्याची पध्दत स्वतंत्र पानावर दिलेली आहे. ( परिशिष्ठ २ )

प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण
अमरावती

# परिशिष्ठ -१

## ऑन लाईन पध्दतीने अर्ज करण्याची पध्दत खालील प्रमाणे आहे.

(१) उमेदवाराने पुर्ण जाहीरात वाचुन झाल्यानंतर ऑन लाईन अर्ज भरण्याची कार्यवाही करावी.

(२) ऑन लाईन अर्ज http://www.jdroamt.org या वेबसाईटवर उपलब्द राहील.

(३) उमेदवाराने ऑन लाईन अर्ज ज्या पदासाठी भरणार आहे,त्या पदाची पात्रता जाहीरातीमध्ये काळजीपुर्वक वाचावी.

(४) ऑन लाईन अर्ज भरण्यासाठी Apply Online हया लिंक वर क्लिक करुन अर्ज भरण्यास सुरवात करावी.संपुर्ण अर्ज हा इंग्रजीमध्ये भरावा.

(५) आपणास अर्ज करावयाचे पद निवडा एक एक करत आणल्यास विचारलेल्या योग्य पर्याय/माहिती भरावी.

(६) आवश्यक माहिती भरल्यानंतर उमेदवारांनी ऑन लाईन पध्दतीने भरलेली माहिती सेव्ह (Save) करावी तदनंतर संगणक प्रणाली तुम्ही नोंदविलेला पासवर्ड व तुमचा अप्लीकेशन आयडी संगणकाच्या स्क्रिनवर दर्शविल, त्याची उमेदवारांनी काळजीपुर्वक नोंद ठेवावी.

(७) अर्ज संगणक प्रणालीव्दारे सेव्ह केल्यानंतर सदर अर्जामध्ये भरलेली माहिती योग्य असल्याची उमेदवारांची खात्री झाल्यास उमेदवाराने अर्ज संगणक प्रणालीवर दिलेल्या " कन्फर्म " या बटनावर क्लिक करुन अर्ज कन्फर्म करावा.

(८) उमेदवाराने कोणत्याही कारणास्तव अर्ज कन्फर्म न केल्यास त्याचा अर्ज विचारात घेतला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

(९) संगणक प्रणालीव्दारे अर्ज भरल्यानंतर व **Save** केल्यानंतर कन्फर्म करण्यापुर्वी उमेदवाराला त्यामध्ये बदल करता येईल परंतु एकदा कन्फर्म केल्यानंतर उमेदवाराला अर्जामध्ये कोणताही बदल करता येणार नाही.

(१०) अर्ज कन्फर्म केल्यानंतर उमेदवाराने संपुर्ण अर्जाची प्रिन्ट आउट काढावी. संपुर्णपणे भरलेल्या अर्जाच्या प्रिन्ट आउट सोबत **'चलान'** ची प्रिन्ट आउट मिळेल.सदर चलान ची प्रत घेउन जवळच्या 'स्टेट बॅक ऑफ इंडिया' चे शाखेत जाउन रोख फी चा भरणा करावा. फी बॅकेत भरल्यानंतर बॅकेतुन प्राप्त रिसिप्ट (चलान ने फी भरली असल्याची) अर्जासोबत जोडावी.उमेदवार ऑन लाईन देखील फी चा भरणा करु शकतो.(परिशिष्ठ २ बघावे)

(११) वरिल प्रमाणे कार्यवाही पुर्ण करुन अर्जावर स्वत:चा साक्षांकीत केलेला फोटो चिटकवुन व अर्जावर स्वत:ची स्वाक्षरी करुन आवश्यक त्या कागदपत्रासह जाहिरातीमध्ये दिलेल्या पत्त्यावर अंतिम दिनांकापुर्वी व वेळेच्या आत पोहचेल या बेताने पाठवावा.उशीरा प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही याची उमेदवाराने नोंद घ्यावी.

(१२) उमेदवाराचा परीक्षा कमांक व परीक्षा केंद्र या कार्यालयाच्या संकेतस्थळावर परीक्षेच्या आधी प्रसिध्द करण्यात येईल. उमेदवाराने आपला Login व password सुरक्षीत ठेवावा तसेच आपल्या Login मध्ये प्राप्त झालेले 'Hall Ticket' प्रिन्ट आउट काढुन दिलेल्या सुचनानुसार परीक्षा केंद्रावर उपस्थित रहावे. याकरीता कोणताही वेगळा पत्रव्यवहार केला जाणार नाही.

**महत्वाची सुचना:- उमेदवारांनी नियमीतपणे वेबसाईट चेक करावी.**

प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण
अमरावती

# 6/8

# परिशिष्ठ -२

## परीक्षा फी भरण्याची पध्दती

( खालील पैकी कोणत्याही एका पध्दतीचा वापर करावा)

**पध्दत कमांक १ :-**

i) प्रथम ऑनलाईन अर्ज या कार्यालयाच्या संकेतस्थळावर भरावा. ( **www.jdroamt.org** )
ii) संपुर्ण भरलेल्या अर्जाची प्रिन्ट आउट काढावी या प्रिन्ट आउट सोबत " चलान " ची प्रिन्ट आउट मिळेल.
iii) सदर प्रिन्ट आउट जवळच्या कोणत्याही 'स्टेट बॅक ऑफ इंडीया ' चे शाखेत जाउन रोख फीचा भरणा करावा.
iv) फी बँकेत भरल्यानंतर बॅकेतुन प्राप्त रिसिप्ट (चलानने फी भरले असल्याची ) अर्जासोबत जोडुन विहीत मुदतीत या कार्यालयास सादर करणे.

**अथवा (OR)**

**पध्दत कमांक २ :-** ऑन लाईन प्रक्रियेतुन फीचा भरणा

i) स्टेट बॅकेच्या संकेतस्थळावर (https://www.onlinesbi.com) मध्ये जाउन State Bank collect हा ऑप्शन सिलेक्ट करावा.
ii) ' State Bank collect ' मध्ये खालील प्रमाणे ऑप्शन सिलेक्ट करुन प्रकिया करावी.

| | |
|---|---|
| State of corporate institution | Maharashtra |
| Type of corporate institution | Recruitment |
| Recruitment Name | Joint director Technical education Amravati |
| Select payment category | Recruitment fees |

या 'Recruitment fees' लिंक मध्ये आपले नाव ,अप्लीकेशन आयडी,कॅटेगीरी ,जन्मतारीख,पदाचे नाव,मोबाईल नंबर,व फीची रक्कम इत्यादी माहिती भरुन ऑनलाईन फी चा भरणा करावा व रिसिप्टची प्रिंट आउट अर्जासोबत जोडावी.

# 7/8

# महत्वाच्या तारखा

| अ.क्र. | कार्यक्रम | दिनांक | |
|---|---|---|---|
| | | पासुन | पर्यंत |
| १ | अर्ज ऑन लाईन नोंदनी (Registration) करण्याचा कालावधी | १५ जानेवारी २०१५ | २९ जानेवारी २०१५ |
| २ | संगणकिय चलानाव्दारे स्टेट बॅंक ऑफ इंडिया (SBI) च्या शाखामध्ये स्वीकृतीचा कालावधी | १६ जानेवारी २०१५ | ३० जानेवारी २०१५ |
| ३ | ज्या उमेदवारांनी बॅंकेमध्ये दि.३० जानेवारी पर्यंत भरती प्रक्रिया शुल्क जमा केले असेल त्यांच्यासाठी अर्ज विभागीय कार्यालय अमरावती येथे सादर करण्याचा कालावधी | ४ फेब्रुवारी २०१५ (सायंकाळी ५.०० वाजपर्यंत) | |

प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण
अमरावती

# 8/8